Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। बुधवार, दि. १५ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ९७ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

जळगाव जिल्हा बँकेच्या संचालकांवर कारवाईचे आदेश

(पान २ वर)



» Selected

### सुप्रीम कोर्टाने रैनासह चोघांना ठोठावला प्रत्येकी ३ लाखांचा दंड

**जळगाव :** सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. १४ जुलै) प्रसिद्ध कॉमेडियन समय रैनासह एकूण पाच जणांना प्रत्येकी ३ लाख रुपयांचा दंड ठोठावला. यामध्ये सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर विपुल गोयल, बलराज परमजीत सिंग घई, सोनाली ठक्कर आणि निशांत तंवर यांचा समावेश आहे. या सर्वांना दोन आठवड्यांच्या आत ही रक्कम जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशाचे पालन न केल्यास दंडाची रक्कम वाढू शकते. सुप्रीम कोर्टाच्या एका जुन्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल या सर्वांना हा दंड ठोठावण्यात आला आहे, ज्या आदेशानुसार त्यांना त्यांच्या शो दरम्यान दोन दिव्यांग व्यक्तींना देखील सहभागी करून घेण्याचा आदेश देण्यात आला होता.दिव्यांग व्यक्तींची खिल्ली उडवल्या प्रकरणी 'क्योर एसएमए इंडिया फाउंडेशन'ने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

## शिंदे-शहा बैठक; मंत्रिमंडळ विस्तार, खासदारांचे विलीनीकरण आणि विकास निधीवर मंथन

# एकनाथ शिंदे-अमित शहा 50 मिनिटे समोरासमोर

### मंत्र्यांच्या बैठकीनंतर शिंदेंचा दिल्ली दौरा; अमित शहांसोबत ५० मिनिटांची चर्चा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील 'नंदनवन' या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या सर्व कॅबिनेट मंत्र्यांची बैठक घेतल्यानंतर दिल्ली गाठली.**

दिल्लीत त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि नुकतेच शिवसेनेत दाखल झालेल्या सहा खासदारांसह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. सुमारे ५० मिनिटे चाललेल्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार, लोकसभेतील पक्षीय घडामोडी, प्रलंबित विकासकामे आणि केंद्राच्या सहकार्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.मुंबईतील बैठकीत राज्य मंत्रिमंडळातील संभाव्य फेरबदल, काही मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा तसेच महामंडळांवरील नियुक्त्यांवर चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.काही मंत्र्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी याबाबत अद्याप अधिकृत



घोषणा झालेली नाही. दिल्लीतील बैठकीत शिवसेनेत दाखल झालेल्या सहाही खासदारांच्या मतदारसंघांतील प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक निधी आणि केंद्र सरकारच्या विविध प्रकल्पांबाबत चर्चा झाली. मतदारसंघांतील लोककल्याणकारी योजनांसाठी निधी किंवा अन्य आवश्यक बाबींमध्ये कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही अमित शहा यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. बैठकीत केंद्र सरकारच्या संभाव्य मंत्रिमंडळ विस्तारावरही चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. शिवसेनेला केंद्रात एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, कॅबिनेट मंत्रिपदासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र, याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही. ठाकरे गटातून शिंदे गटात दाखल झालेल्या सहा खासदारांच्या लोकसभेतील औपचारिक विलीनीकरणाची प्रक्रिया लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. लोकसभा सचिवालयाकडून याबाबतची अधिकृत घोषणा झाल्यानंतर संसदेत शिंदे गटाची ताकद आणखी वाढणार असल्याचे मानले जात आहे. मुंबईतील बैठकीत राज्यातील विविध महामंडळांवरील रखडलेल्या नियुक्त्यांवरही चर्चा झाली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच विविध पदांवर नियुक्त्या करण्याबाबत वरिष्ठ मंत्र्यांशी सविस्तर मंथन करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

#### उद्धव ठाकरेंवर शिंदेंचा निशाणा

बैठकीपूर्वी माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला ठाकरे यांनी दिलेल्या पाठिंब्यावरून शिंदे म्हणाले, "सरकारविरोधातील प्रत्येक आंदोलनाला बाहेरून पाठिंबा देण्याचे काम विरोधक करत आहेत. काही मंत्र्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक निधी आणि केंद्र सरकारच्या विविध प्रकल्पांबाबत चर्चा झाली. देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे." त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचाही दावा केला. राज्यातील मंत्रिमंडळ विस्तार, महामंडळ नियुक्त्या आणि केंद्रातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, आता महायुती आणि केंद्रीय नेतृत्वाच्या पुढील निर्णयाकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## पी. आर. हायस्कूलमध्ये मोफत वह्या वाटप कार्यक्रम उत्साहात

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव येथील पी. आर. हायस्कूलमध्ये भवरलालभाऊ जैन तालुका सार्वजनिक शासकीय वाचनालयाच्या वतीने आणि जैन इरिगेशनचे संचालक अशोकभाऊ जैन यांच्या सहकार्याने मंगळवारी (दि. १४ जुलै) मोफत वह्या वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी. आर. हायस्कूलचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील होते.

यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष, अखिल भारतीय मराठा सेवा संघाचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अशोकभाऊ जैन यांच्या सहकार्याने गेल्या दहा वर्षांपासून धरणगाव तालुक्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप केले जात आहे. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळत असून, शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध झाल्याने त्यांना शिक्षणात मदत होते.

ते पुढे म्हणाले की, अनेक दानशूर व्यक्ती शैक्षणिक साहित्य वाटपाचे उपक्रम राबवत असतात. मात्र शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच वह्यांचे वितरण झाल्यास विद्यार्थ्यांना त्याचा अधिक लाभ होतो.

समाजातील सक्षम व्यक्तींनी अशा उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला वाचनालयाचे उपाध्यक्ष तथा भावी जिल्हा परिषद सदस्य चंदन पाटील, पर्यवेक्षक डी. एच. कोळी, वाचनालयाचे सचिव योगेश पी. पाटील, मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक वाल्मीक पाटील, माजी नगरसेवक नंदकिशोर पाटील, एस. के. बेलदार, जी. आर. सूर्यवंशी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

## घरकुल योजनेचा लाभ मिळण्याबाबत जिल्हा जनरल कामगार सेनेचे निवेदन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद| प्रतिनिधी :** नशिराबाद नगर परिषद हद्दीतील भवानी नगर परिसरात अत्यंत गरीब व गरजू नागरिक वास्तव्य करत आहेत. या भागातील अनेक घरे झोपडपट्टीसदृश अवस्थेत असून अनेक कुटुंबे कच्च्या व जीर्ण घरांमध्ये राहतात. पावसाळ्यात घरांमध्ये पाणी गळते, तर अनेकांना सुरक्षित निवाऱ्याचा अभाव आहे. या पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्हा जनरल कामगार सेनेचे अध्यक्ष श्री. प्रदिप साळी यांनी अस्थापना प्रमुख गितांजली राऊत मॅडम यांना निवेदन दिले आहे.

हे निवेदन खालील पदाधिकाऱ्यांना देखील देण्यात आले आहे: मा. जिल्हाधिकारी, जळगाव. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग. *मा.प्रधानसचिव,गृहनिर्माणविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई. मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

*समस्येचे स्वरूप:*

भवानी नगर परिसरातील बहुसंख्य नागरिकांकडे ७/१२ उतारा किंवा सिटी सर्वे उतारा नसून नमुना ८-अ उपलब्ध आहे, त्यामुळे त्यांना शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

## धरणगावात शाळेत डेंग्यू जनजागृती कार्यक्रम उत्साहात

जन सम्राट टाईम्स




**धरणगाव | प्रतिनिधी :** तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र आणि 'आपला दवाखाना', धरणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डेंग्यू जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम जाधव आणि तालुका आरोग्य सहाय्यक संजय ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यूची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी परिसरात साचलेले पाणी नष्ट करणे, घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करणे आणि डासांपासून संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ताप, अंगदुखी किंवा डेंग्यूसदृश लक्षणे आढळल्यास त्वरित शासकीय आरोग्य संस्थेत जाऊन तपासणी व उपचार घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही (HPV) लसीकरणाचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले. पात्र मुलींनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एचपीव्ही लस घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात संसर्गजन्य आजारांपासून बचावासाठी योग्य पद्धतीने हात धुण्याचे (HAND WASH TECHNIQUE) प्रात्यक्षिक सादर करून वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. यावेळी आरोग्य पर्यवेक्षक भंगाळे सर, आरोग्य सहाय्यक आधार भोई, स्टाफ नर्स सुरेखा वसावे, स्टाफ नर्स पायल वाघ, एमपीडब्ल्यू मयूर पाटील, शाळेचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनावणे, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. डेंग्यू प्रतिबंध, वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयी अंगीकारून आपल्या कुटुंबात व परिसरात जनजागृती करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी यावेळी केला.

## महाराष्ट्र–मध्यप्रदेश जोडणारा पूल पहिल्याच पावसात गेला वाहून; शिरपूर तालुक्यातील रिच्यापाडा येथील घटना

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर (धुळे) | प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील रिच्यापाडा येथे महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणारा नव्याने बांधलेला पूल पहिल्याच पावसात वाहून गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अवघ्या महिनाभरापूर्वी बांधण्यात आलेला हा पूल कोसळल्याने दोन्ही राज्यांतील नागरिकांचा संपर्क विस्कळीत झाला असून, वाहतुकीसाठी मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.

या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पुलावरच ठिय्या आंदोलन करत निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच नव्याने दर्जेदार पूल उभारण्याची मागणीही करण्यात आली. स्थानिकांच्या माहितीनुसार, जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि शिरपूर पंचायत समिती बांधकाम विभागाच्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत लाखो रुपयांचा निधी खर्च करून या पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र पहिल्याच पावसात पूल वाहून गेल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पुलाचे बांधकाम सुरू असताना संबंधित अभियंते आणि स्थानिक प्रशासनाने कामाची गुणवत्ता तपासली होती का, कामावर आवश्यक देखरेख ठेवण्यात आली होती का, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.

रिच्यापाडा, पळासनेर आणि परिसरातील गावांसह मध्यप्रदेशातील आंबापाणी व इतर ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. यापूर्वी पूल नसल्यामुळे नागरिकांना ओढ्यातून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. नव्याने पूल उभारल्यानंतर नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र पहिल्याच पावसात पूल वाहून गेल्याने पुन्हा एकदा दोन्ही राज्यांतील ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, राज्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या गुणवत्तेबाबतही या घटनेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाकडून ग्रामीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असताना निकृष्ट दर्जाच्या कामांवर नियंत्रण ठेवण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. या प्रकरणी मध्यप्रदेशातील आंबापाणी येथील सुरेश यादव, लालसिंग चौहान, तसेच रिच्यापाडा येथील आसिराम पावरा आणि हरसिंग नत्थू पवार यांच्यासह स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत तातडीने चौकशीची मागणी केली आहे.

## संघर्षाला दिशा देणाऱ्या नेतृत्वाचा सन्मान

### आ. किशोरआप्पा पाटील यांचा गौरव




जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधीचे मूल्यमापन केवळ निवडणुकीतील विजयावर होत नाही, तर जनतेच्या प्रश्नांबाबत घेतलेल्या भूमिकेवर, शासन स्तरावर केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यावर आणि समाजहितासाठी निर्माण केलेल्या विश्वासावर होत असते. भडगाव–पाचोरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोरआप्पा पाटील यांनी शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आणि सुशासनासाठी घेतलेल्या ठोस भूमिकेची दखल घेत पत्रकार बांधवांच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित होता. चाळीसगाव व जामनेर तालुक्यांप्रमाणेच पाचोरा आणि भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनाही समान न्याय मिळावा, या मागणीसाठी उपोषणकर्ते गुलाबसिंग पाटील आणि आंदोलक संदीप महाजन यांनी आंदोलन छेडले होते. या आंदोलनाला आमदार किशोरआप्पा पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देत पाठिंबा दिला. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक प्रस्ताव तातडीने मंत्रालयात पाठविण्याच्या सूचना देत त्यांनी हा विषय शासनाच्या निर्णय प्रक्रियेपर्यंत पोहोचविला. उपोषणादरम्यान आंदोलनकर्त्यांची प्रकृती खालावल्यावरही त्यांनी स्वतः पुढाकार घेत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास दिला. त्यानंतर झालेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पाचोरा तालुक्यासाठी २७ कोटी रुपये आणि भडगाव तालुक्यासाठी २२ कोटी रुपये, असा एकूण ४९ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. या निर्णयामुळे हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. याचबरोबर राज्याच्या २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात आमदार किशोरआप्पा पाटील यांनी अन्न व औषधे प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या कार्याचे विधानसभेत जाहीर कौतुक केले. प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि पारदर्शक प्रशासन देणाऱ्या अधिकाऱ्यांना सातत्याने काम करण्याची संधी मिळाली पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या अन्न व औषधे प्रशासन विभागात सक्षम आणि सातत्यपूर्ण नेतृत्व राहणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहून सुशासनाला बळ देणे, या दोन्ही भूमिकांमधून आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या कार्यशैलीचे वेगळेपण अधोरेखित झाल्याचे उपस्थितांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनीही या निर्णय प्रक्रियेत सकारात्मक भूमिका बजावल्याबद्दल शेतकरी वर्गाने कृतज्ञता व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## एसटी प्रवाशांना पुन्हा झटका! महामंडळाचा 13.50 टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव

### हंगामी १० टक्के वाढीनंतर आणखी ३.५० टक्क्यांची भर; तिकीटे पाच रुपयांच्या पटीत

जन सम्राट टाईम्स




**मुंबई प्रतिनिधी:** उन्हाळ्यातील हंगामी भाडेवाढ संपुष्टात आल्यानंतर दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असलेल्या लाखो एसटी प्रवाशांना पुन्हा एकदा महागाईचा फटका बसण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) १३.५० टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव तयार केला असून, बुधवारी होणाऱ्या राज्य परिवहन प्राधिकरण (एसटीए) बैठकीत या प्रस्तावावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

राज्यात १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत १० टक्के हंगामी भाडेवाढ लागू करण्यात आली होती. त्यानंतर या वाढीला १५ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. ही मुदत संपत असतानाच महामंडळाने आता १३.५० टक्के भाडेवाढीची शिफारस केली आहे. याचा अर्थ, सध्या लागू असलेल्या १० टक्के वाढीमध्ये आणखी ३.५० टक्क्यांची भर पडणार आहे. पाच रुपयांच्या पटीत तिकीट प्रवासी आणि वाहक यांच्यात सुट्ट्या पैशांवरून वारंवार होणारे वाद लक्षात घेऊन यंदा तिकीट दर पाच रुपयांच्या पटीत निश्चित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यामुळे सुट्ट्या पैशांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटेल, असा दावा एसटी प्रशासनाने केला आहे.

भाडेवाढीमागील कारणे महामंडळाच्या मते, कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये झालेली वाढ, डिझेलच्या वाढलेल्या किमती, बसगाड्यांच्या सुट्या भागांचा वाढता खर्च तसेच टायरच्या दरात झालेली वाढ यामुळे आर्थिक भार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे हा खर्च भागवण्यासाठी भाडेवाढ आवश्यक असल्याचे महामंडळाचे म्हणणे आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने गर्दीच्या हंगामात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची मुभा दिली आहे.

तसेच राज्य सरकारनेही एसटी महामंडळाला स्वतःच्या उत्पन्नातून कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च भागविण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

#### महसूल वाढवण्यासाठी भाडेवाढ अपुरी

हंगामी भाडेवाढीनंतरही महामंडळाच्या आर्थिक स्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. मे महिन्यात महामंडळाचे वाहतूक उत्पन्न १,०४७.१७ कोटी रुपये, तर एकूण खर्च १,०९६.०७ कोटी रुपये इतका नोंदविण्यात आला. राज्यातील ३१ पैकी २२ विभागांना स्वतःचा खर्च भागविण्याइतपतही महसूल मिळालेला नाही, त्यामुळे केवळ भाडेवाढ करून आर्थिक संकट दूर होणार नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. दरम्यान, जानेवारी २०२५ मध्ये १४.९५ टक्के भाडेवाढ करण्यात आली होती. त्यावेळी एक रुपयांच्या पटीत तिकीट दर निश्चित करण्यात आल्याने सुट्ट्या पैशांवरून प्रवासी आणि वाहकांमध्ये अनेक वाद निर्माण झाले होते. यामुळे यंदा पाच रुपयांच्या पटीचा पर्याय स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास राज्यभरातील लाखो एसटी प्रवाशांना पुन्हा एकदा वाढीव भाड्याचा सामना करावा लागणार असून, महागाईच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांच्या प्रवास खर्चात आणखी वाढ होणार आहे.

# भडगाव पोलिसांची धडाकेबाज कारवाई!

## सोलर कॉपर वायर चोरीप्रकरणी ९ आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स



**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव पोलिसांनी सोलर प्लांटमधील कॉपर वायर चोरीच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या काही तासांत छडा लावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या कारवाईत ९ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून सुमारे ५ लाख १५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील सोलर प्रकल्पांमध्ये वाढत असलेल्या चोरीच्या घटनांना मोठा आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जुलैच्या मध्यरात्री नियमित गस्तीदरम्यान संशयास्पद हालचाली करणाऱ्या काही इसमांना ताब्यात घेण्यात आले.

सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी केलेल्या कसून चौकशीत त्यांनी भडगाव रोडलगत असलेल्या सोलर प्लांटमधून कॉपर वायर चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संपूर्ण टोळीला जेरबंद केले. आरोपींकडून सुमारे ४ हजार मीटर सोलर कॉपर वायर, लोखंडी कटर, स्क्रू ड्रायव्हर, ८ मोबाईल फोन, एक मोटारसायकल तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेले इतर साहित्य असा एकूण ५.१५ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी भडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींकडून जिल्ह्यातील इतर चोरीच्या घटनांबाबतही सखोल चौकशी सुरू आहे. या तपासातून आणखी काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. शिरसोलीतील ९ आरोपी अटकेत या कारवाईत जानकीराम भागवत मोरे (२२), रवि सोमा भिल (२२), सुका संजय भिल (१९), अनिल अर्जुन भिल (२७), शुभम सुरेश भोई (२३), योगेश दिगंबर भिल (२०), संजय नारायण सोनवणे, आदिल शेख शफिक मणियार (४८) आणि जितू यशोनाथ पवार (२०) (सर्व रा. इंदिरा नगर, शिरसोली, ता. जि. जळगाव) यांना अटक करण्यात आली आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश टाक यांच्या नेतृत्वात पार पडली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक सुशील सोनवणे यांच्यासह गोहर्धन बोरसे, निलेश ब्राम्हणकर, हंसराज देशमुख, भावराव पाटील, दीपक पाटील, प्रवीण परदेशी, सुनील राजपूत, संदीप सोनवणे आणि प्रदीप परदेशी यांनी मोलाची भूमिका बजावली. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गोहर्धन बोरसे करीत आहेत.

### 5.15 लाख किमतीचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जुलैच्या मध्यरात्री नियमित गस्तीदरम्यान संशयास्पद हालचाली करणाऱ्या काही इसमांना ताब्यात घेण्यात आले. सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी केलेल्या कसून चौकशीत त्यांनी भडगाव रोडलगत असलेल्या सोलर प्लांटमधून कॉपर वायर चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संपूर्ण टोळीला जेरबंद केले. आरोपींकडून सुमारे ४ हजार मीटर सोलर कॉपर वायर, लोखंडी कटर, स्क्रू ड्रायव्हर, ८ मोबाईल फोन, एक मोटारसायकल तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेले इतर साहित्य असा एकूण ५.१५ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# एमएसआरटीसीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त पारोळा बसस्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पारोळा-एरंडोल मतदारसंघाचे आमदार अमोल चिमणराव पाटील यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत बी. पाटील, तालुकाप्रमुख मधुकरआबा पाटील, शिवसेना गटनेते तथा नगरसेवक अमृत चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनीष पाटील, माजी उपनगराध्यक्ष सुदाम चौधरी, माजी शहरप्रमुख बापूसाहेब मिस्तरी, नगरसेवक मनोज जगदाळे, राजू कासार, प्रमोद कासार, विनोद पाटील, शिवसेना उपगटनेते तथा नगरसेवक पंकज मराठे, नगरसेवक विवेक पाटील, नजीरखान बेलदार, पारोळा आगाराचे व्यवस्थापक सतीश सातपुते, चालक-वाहक, बसस्थानक परिसरातील व्यावसायिक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमात पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि हरित पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे जतन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वृक्षारोपणासारख्या उपक्रमांमधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासह भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. "एक वृक्ष लावा... पर्यावरण वाचवा, भविष्यातील पिढ्यांना हरित वारसा द्या!" असा संदेशही यावेळी देण्यात आला.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# घरोघर पोहोचली मतदार जनजागृती!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा पुढाकार




जन सम्राट टाईम्स

**पाळधी । प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) अभियानांतर्गत पाळधी परिसरात मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारातून आणि युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या नियोजनातून शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी मतदान केंद्र स्तरावर विशेष शिबिरे व घराघर संपर्क अभियान सुरू केले आहे. एकही पात्र नागरिक मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहू नये, या उद्देशाने मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती, स्थलांतरित मतदारांची नोंद तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी पाळधी परिसरातील विविध मतदान केंद्रांवर आयोजित विशेष शिबिरांना भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत मतदार नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आवश्यक सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले.

१६ जुलै रोजी आयोजित विशेष शिबिरात पात्र मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून आपली मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती किंवा इतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणे ही लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. या अभियानात स्थानिक पदाधिकारी, बूथस्तरीय कार्यकर्ते आणि स्वयंसेवक घराघर जाऊन नागरिकांना मतदार नोंदणी प्रक्रियेची माहिती देत असून, विशेष शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन करत आहेत.

# भविष्यातील खरी संपत्ती: कृत्रिम बुद्धिमत्ता नव्हे, तर अन्न निर्माण करणारी माती!"



विश्लेषण

**सुरेश जगताप**
विद्रोही पत्रकार व सामाजिक विश्लेषक उल्हासनगर

आज जग एका अभूतपूर्व वळणावर उभे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऑटोमेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन अधिक वेगवान, आधुनिक आणि सोयीचे झाले असले तरी या प्रगतीच्या झगमगाटामागे एक मोठे वास्तव दडलेले आहे. माहिती निर्माण करणाऱ्या यंत्रांची संख्या वाढत आहे; पण अन्न निर्माण करणारे हात मात्र कमी होत आहेत. हीच बाब आजच्या आणि उद्याच्या भारतासाठी सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. एकेकाळी उच्च शिक्षण, मोठी कंपनी आणि भरघोस पगार म्हणजे आयुष्याची शाश्वती असे मानले जात होते. परंतु आज AI मुळे आयटी, बँकिंग, वित्त, डिझाईन, ग्राहक सेवा अशा अनेक क्षेत्रांतील नोकऱ्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनेक कामे संगणक काही सेकंदांत करत आहेत. त्यामुळे लाखो तरुणांच्या रोजगाराचे भवितव्य अनिश्चित होत चालले आहे. परंतु या बदलाच्या काळात एक क्षेत्र मात्र आजही अढळ आहे—शेती. कारण कोणतेही यंत्र, कोणताही रोबोट किंवा कोणतीही कृत्रिम बुद्धिमत्ता माणसासाठी अन्न निर्माण करू शकत नाही. अन्न, पाणी आणि ऊर्जा या मानवजातीच्या मूलभूत गरजा आहेत. त्याला पर्याय नाही आणि कधीच असणार नाही. याच कारणामुळे शेतकऱ्याला मिळणाऱ्या सवलती किंवा कर्जमाफीकडे केवळ आर्थिक मदत म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. शेतकरी केवळ स्वतःच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या अन्नसुरक्षेसाठी झटत असतो. दुष्काळ असो, पूर असो, महामारी असो किंवा युद्ध—शेतकरी पेरणी थांबवत नाही. कोरोनाच्या काळात उद्योगधंदे बंद झाले, कार्यालये ओस पडली; पण शेतातील नांगर थांबला नाही. त्यामुळे शेती ही केवळ व्यवसाय नसून राष्ट्राच्या अस्तित्वाची हमी आहे.

दुर्दैवाने गेल्या काही दशकांत विकासाचा अर्थ केवळ शहरीकरण असा घेतला गेला. गावे रिकामी झाली, तरुण शहरांकडे धावले, शेती वृद्धांच्या हाती राहिली. गावातील तेलघाण्या, लघुउद्योग, दुग्धव्यवसाय, पारंपरिक बियाणे, जलव्यवस्था आणि स्थानिक अर्थचक्र हळूहळू लयाला गेले. परिणामी शहरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण वाढला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था कमकुवत झाली. आता काळ बदलत आहे. रोजगाराच्या बदलत्या समीकरणामुळे अनेकांना पुन्हा गावाकडे वळावे लागेल. मात्र गावांनीही जुन्या चौकटीत राहून चालणार नाही. आधुनिक शेती, अन्न प्रक्रिया उद्योग, नैसर्गिक शेती, बहुपिक पद्धती, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, मधमाशी पालन, सौरऊर्जा, पाणी संवर्धन आणि स्थानिक रोजगारनिर्मिती या माध्यमातून गावांना उत्पादनकेंद्र बनवावे लागेल. भारतासारख्या कृषिप्रधान देशाने खाद्यतेल, डाळी, बियाणे आणि अन्नधान्यासाठी परदेशांवर अवलंबून राहणे ही राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोक्याची बाब आहे. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण झाले, स्थानिक प्रक्रिया उद्योग उभे राहिले, शेतमालाला मूल्यवर्धन मिळाले आणि शेतकऱ्याला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची व्यवस्था झाली, तर ग्रामीण भारताची आर्थिक क्रांती दूर राहणार नाही. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज आहे. हवामानाचा अंदाज, माती परीक्षण, ड्रोनद्वारे फवारणी, स्मार्ट सिंचन, बाजारभाव विश्लेषण आणि AI आधारित शेती व्यवस्थापन यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्न वाढू शकते. म्हणजेच AI हा शेतीचा शत्रू नसून योग्य वापर केल्यास तो शेतकऱ्याचा सक्षम सहकारी ठरू शकतो.

आगामी काळात सुरक्षित तोच असेल ज्याच्याकडे जमीन, पाणी, कौशल्य, अन्न उत्पादनाची क्षमता आणि विविध उत्पन्नाचे स्रोत असतील. केवळ मोठा पगार, मोठे कर्ज आणि एकाच नोकरीवर अवलंबून असलेली जीवनशैली भविष्यात अधिक धोकादायक ठरू शकते. आज गरज आहे ती केवळ "मेक इन इंडिया"ची नाही, तर "ग्राम इन इंडिया" या नव्या विचाराची. उद्योग ग्रामीण भागात गेले पाहिजेत, प्रक्रिया उद्योगांना चालना मिळाली पाहिजे, गावातील तरुणांना गावातच रोजगार मिळाला पाहिजे आणि शेतीला राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले पाहिजे.

देशाची खरी ताकद उंच इमारतींमध्ये नसते; ती सुपीक शेतात असते. राष्ट्राची खरी समृद्धी शेअर बाजारात नसते; ती धान्याच्या कोठारात असते. आणि भविष्यातील सुरक्षितता कृत्रिम बुद्धिमत्तेत नाही, तर अन्न निर्माण करणाऱ्या मातीत आहे.

आजचा निर्णय उद्याच्या पिढीचे भविष्य ठरवणार आहे. म्हणूनच शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून नव्हे, तर भारताच्या आर्थिक, सामाजिक आणि राष्ट्रीय सुरक्षेचा मजबूत पाया म्हणून पाहण्याची वेळ आली आहे.

# कर्मचारी टंचाईमुळे भुसावळ पुरवठा विभागाचे कामकाज विस्कळीत!

जन सम्राट टाईम्स




**भुसावळ । प्रतिनिधी :** भुसावळ तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात कर्मचाऱ्यांची तीव्र कमतरता असल्याने विभागाच्या दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम होत आहे.

रेशन दुकानदारांशी संबंधित कामे, धान्य वितरण, शिधापत्रिकेची प्रकरणे तसेच विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक दाखले देण्यास विलंब होत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. सध्या पुरवठा विभागाचा कारभार केवळ दोन कर्मचाऱ्यांवर सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. वाढत्या कामाच्या ताणामुळे अनेक कामे प्रलंबित राहत असून नागरिकांना वेळेवर सेवा मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. नवीन शिधापत्रिका (रेशन कार्ड) मंजूर करणे, नावात बदल करणे, शिधापत्रिकेतील दुरुस्ती, महात्मा फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी आवश्यक दाखले देण्यास विलंब होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. पुरवठा विभागातील धान्य गोदाम व्यवस्थापक, पुरवठा निरीक्षक आणि डेटा एन्ट्री ऑपरेटर ही महत्त्वाची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे कामाचा अतिरिक्त भार विद्यमान कर्मचाऱ्यांवर पडत असून सेवा वितरणावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. नागरिकांनी प्रशासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन रिक्त पदांवर तातडीने भरती करावी, तसेच पुरवठा विभागाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून नागरिकांना वेळेवर सेवा मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

# जळगाव जिल्हा बँकेच्या संचालकांवर कारवाईचे आदेश

## चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश




जन सम्राट टाईम्स


**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाविरोधातील तक्रारीची गंभीर दखल घेत नाशिक विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांना दोन स्वतंत्र पत्रांद्वारे सखोल चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. ही दोन्ही पत्रे दि. १३ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आली आहेत.

पहिल्या पत्रात बँकिंग रेग्युलेशन (सुधारणा) अधिनियम, २०२५, रिझर्व्ह बँकेच्या (RBI) मार्गदर्शक तत्त्वे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशांनुसार जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर अपात्रतेची कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्रासह सुरेश पाटील यांच्या निवेदनाची दखल घेऊन संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दुसऱ्या पत्रात बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५, RBI च्या मार्गदर्शक सूचना आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी न करता मागील सुमारे २२ महिन्यांपासून कथित नियमबाह्य कारभार झाल्याच्या आरोपांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच संबंधित अधिकारी व संचालकांवर आवश्यक कायदेशीर आणि प्रशासकीय कारवाईबाबत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. या दोन्ही पत्रांमध्ये लोकनियुक्त सरपंच तथा तक्रारदार श्री. सुरेशआप्पा गो. पाटील (रा. झुरखेडा, ता. धरणगाव, जि. जळगाव) यांनी केलेल्या निवेदनातील मुद्द्यांनुसार स्थानिक स्तरावर चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह वस्तुस्थितीदर्शक अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधकांना देण्यात आले आहेत. या घडामोडींमुळे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराबाबत पुढील प्रशासकीय आणि कायदेशीर कार्यवाहीकडे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'पोलादी पुरुष' : गणपत महादेव जाधव

## कुशल संघटक आणि समता चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांचे प्रेरणादायी जीवन




विशेष लेख

**संघरत्न सपकाळे**
भुसावळ

भारतीय सामाजिक चळवळीच्या इतिहासात अनेक कार्यकर्त्यांनी पडद्यामागे राहून मोठे योगदान दिले. अशाच निष्ठावंत, धाडसी आणि समर्पित कार्यकर्त्यांपैकी एक म्हणजे गणपत महादेव जाधव उर्फ मडकेबुवा (१८७९–१९४८). डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अत्यंत विश्वासू सहकारी, अंगरक्षक, कुशल संघटक आणि कामगार चळवळीतील प्रभावी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. मडकेबुवा सुरुवातीला माळकरी बुवा म्हणून ओळखले जात होते. ते भगवा वेष धारण करत असत. त्याचबरोबर ते उत्कृष्ट मोटार मेकॅनिक होते. संभाजी तुकाराम उर्फ दादासाहेब गायकवाड यांच्याकडून त्यांनी मोटार दुरुस्तीचे प्रशिक्षण घेतले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात आल्यानंतर त्यांनी माळा आणि भगवा वेषाचा त्याग केला. त्यानंतर त्यांनी मखमली नऊवारी धोतर, कोट आणि काळी किंवा मखमली टोपी असा साधा पण देखणा पोशाख स्वीकारला आणि तो आयुष्यभर कायम ठेवला.

### आफ्रिकेतील नोकरी सोडून भारतात परतले

एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांना १९२८ मध्ये आफ्रिकेत बॉयलर मेकर म्हणून दरमहा ४०० रुपयांच्या पगारावर नोकरी दिली. मात्र तेथे वातावरणाशी जुळवून घेता न आल्याने १९२९ मध्ये ते भारतात परतले. मुंबईत आल्यानंतर त्यांनी मडकी विकण्याचा व्यवसाय सुरू केला. त्यांना "मडकेबुवा" म्हणून ओळख मिळाली.

### बाबासाहेबांचे विश्वासू सहकारी आणि अंगरक्षक

१९२४ मध्ये दामोदर हॉल परिसरात राहात असल्यामुळे त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी निकटचा परिचय झाला. पुढे ते बाबासाहेबांचे अत्यंत विश्वासू सहकारी आणि निष्ठावंत अनुयायी बनले. पुणे कराराच्या काळात देशात तणावपूर्ण वातावरण होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत मडकेबुवा बाबासाहेबांच्या नकळत सावलीसारखे त्यांच्या सोबत राहत आणि प्रत्येक संकटात त्यांच्या सुरक्षेसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालत. त्यामुळे त्यांना बाबासाहेबांचे "बॉडीगार्ड" म्हणूनही ओळखले जाऊ लागले.

### कामगार आणि सामाजिक चळवळीतील प्रभावी नेतृत्व

१९३४ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई म्युनिसिपल कामगार संघात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष होते, तर मडकेबुवा चिटणीस म्हणून कार्यरत होते. त्यांनी कामगार चळवळीत प्रभावी नेतृत्व केले. **डॉ. आंबेडकरांनी त्यांची "मुंबई प्रदेश शेड्युल्ड कास्ट** फेडरेशन"च्या अध्यक्षपदी नियुक्ती केली होती. ते उत्कृष्ट संघटक आणि प्रभावी वक्ते होते. मुंबईतील बाबासाहेबांच्या सभा, परिषदांचे नियोजन आणि आयोजनात त्यांची महत्त्वाची भूमिका असे. 'पोलादी पुरुष' म्हणून ओळख ज्याप्रमाणे सरदार वल्लभभाई पटेल यांना "पोलादी पुरुष" म्हटले जाते, त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील निष्ठा, धैर्य आणि समर्पणामुळे मडकेबुवांना "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पोलादी पुरुष" असे संबोधले जाते.

### बाबासाहेबांचा भावनिक शोकसंदेश

२८ मार्च १९४८ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मडकेबुवांचे निधन झाले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिल्लीत कायदेमंत्री म्हणून कार्यरत होते. मडकेबुवांच्या निधनाची बातमी समजताच त्यांनी शोकसंदेश पाठवला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306